REGISTERED No. B. 3434




# अर्थ

‘ अर्थ एव प्रधानः ’ इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख ५ जून १९४६ अंक २३

—: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

खादी मन्दिर


२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २







पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा




पुणें चीफ एजंटसः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें

छत्रे यांचा -कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालकः—एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड
फो. नं. ३३८४९०] मुंबई ४.

घोडा छाप शाईच्या पुड्या
★ दाडेकर कंपनी मुंबई २८. ★






## विविध माहिती

**शेतकऱ्यांसाठी लष्करी पंपिंग सेटस—**मुंबई सरकारला लष्करी खात्याचे शिलकी ५० पंपिंग सेट्स मिळणार आहेत. ते धान्यपिकें काढण्यासाठीं दुष्काळी विभागांतील शेतकऱ्यांस मुख्यतः देण्यांत येतील. प्रत्येक सेटची किंमत २,५०० ते १५,००० रुपये आहे. सेटच्या प्रत्येक अश्वशक्तीस दोन एकर एवढें तरी पीक काढण्याची खरेदीदारानें हमी दिली पाहिजे. हे सेट्स परस्पर दुसऱ्यास विकतां येणार नाहींत.

**ब्रिटिश विजयोत्सवांत रशिया भाग घेणार नाहीं—** येत्या आठ तारखेस लंडन येथें विजयोत्सव साजरा करण्यासाठीं परेड होणार आहे. तीमध्यें भाग घेण्यास रशियाला ब्रिटिश सरकारनें विनंति केली होती. परंतु, रशियाने ती अमान्य केली आहे. २५ फेब्रुवारीपासून अनेक वेळां रशियास विनंति करण्यांत आली परंतु ती निष्फळ ठरली आहे.

**अमेरिकेनें कर्ज मंजूर केल्यावर स्टर्लिंगशिलकांचा प्रश्न—**हिंदुस्थानांत ब्रिटिश मंत्री आले आहेत. ते हिंदुस्थान–ब्रिटनमधील देण्याघेण्याच्या वाटाघाटी करीत नाहींत, त्यांस अशा वाटाघाटी करण्याचा अधिकारहि दिलेला नाहीं, असें ब्रिटिश फडनवीसांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें. अमेरिकन काँग्रेस अमेरिकन–ब्रिटिश कर्जास मान्यता देईपर्यंत स्टर्लिंग शिलकांसंबंधीं कोणतींहि बोलणीं कोणाशीहि सुरू केलीं जाणार नाहींत.

**बंगलोर-म्हैसूर-विजेची आगगाडी—**बंगलोर-म्हैसूर रेल्वे फाटा विजेचा करण्याची योजना आखण्यांत आली आहे, तिला ९० लक्ष रुपये खर्च येईल.

**गुळाच्या रेशनिंगला प्रारंभ !—**अहमदाबाद शहरांत ९ जूनपासून प्रत्येक माणसास दरमहा १४ औंस गूळ दिला जाईल.

**आणखी शास्त्रज्ञ पाहिजेत—**ब्रिटिश विश्वविद्यालयांतून बाहेर पडणाऱ्या शास्त्रज्ञांची संख्या पुष्कळच वाढली नाहीं, तर १९५० अखेर ग्रेटब्रिटनमध्यें १०,००० शास्त्रज्ञांची उणीव निर्माण होईल आणि १९५५ अखेर तो आकडा २६,००० वर जाईल, असें पार्लमेंटच्या कमिटीस आढळून आलें आहे. पुरेसे विद्यार्थी उपलब्ध आहेत परंतु विश्वविद्यालयांची वाढ करून ज्यास्त विद्यार्थ्यांची सोय केली पाहिजे व त्यासाठी सरकारनें आर्थिक सहाय केलें पाहिजे अशी कमिटीची सूचना आहे.

**वैमानिक वहातुकीचा दर उतरला—**कराची ते लंडन वैमानिक प्रवासाला उतारूस सध्या १५१ पौंड पडतात; हा दर आतां उतरवून १२० पौंड करण्यांत आला आहे. १८ जूनपासून नवीन दर अमलांत येईल. युद्धपूर्व दर ह्यापेक्षा ज्यास्त होता.

**इराण्यांपेवजी इंग्रज—**अँग्लो–इराणियन ऑइल कंपनींतील जबाबदारीच्या जागांवरील इराणी नोकरांस काढून त्या जागीं इंग्रजांची नेमणूक करण्यांत येत आहे; व्यवस्थापकांस ज्यांच्याबद्दल शंका वाटत नाहीं असेच इराणी फक्त ठेवण्यांत येत आहेत, अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे.

**रिकाम्या बाटल्यांची निर्गत—**ग्रेट ब्रिटननें जून १९४५ ते फेब्रुवारी १९४६ ह्या मुदतींत १,८९,००० ग्रोस रिकाम्या बाटल्या निर्गत केल्या. त्यांपैकी २९% हिंदुस्थानांत आल्या. दक्षिण आफ्रिकेनें २४% घेतल्या.

**व्हिस्कीची निर्गत कशासाठी ?—**"ग्रेट ब्रिटनने १९४५ साली अमेरिकेकडे २१,६८,८०९ गॅलन व्हिस्की निर्गत केली, त्याऐवजी ती खुद्द ग्रेट ब्रिटनमध्येंच खपली असती तर तिचेवर ब्रिटिश सरकारला २५ कोटि रुपये एक्साइज ड्यूटीच्या रूपाने मिळाले असते," असें उत्तर सर टॉमस मूर ह्यांस कॉमन्स सभेंत देण्यांत आलें. इतकी व्हिस्की निर्गत करून फक्त १½ कोटि डॉलर्सच मिळतात., तेव्हां त्याऐवजी व्हिस्की देशांतच खपवून २५ कोटि रुपये एक्साइज ड्यूटी मिळवणें श्रेयस्कर नाहीं काय ? असें त्यावर त्यांनीं विचारलें. ग्रेट ब्रिटनच्या कागदी पौंडाचे बदली खणखणीत डॉलर्स देण्यास अमेरिका तयार होणार नाहीं., व्हिस्कीवर ते डॉलर्स खर्चण्यास त्यांची तक्रार नाहीं, हें त्या प्रश्नाचें खरें उत्तर आहे.

**डॉ. शिरनामे पॅलेस्टाइनकडे रवाना—**पॅलेस्टाइनमधील शेतीसुधारणा व फळांची लागवड ह्यांचा परिचय करून घेण्यासाठीं हिंदुस्थान सरकाने पांच जणांचें मंडळ पाठविलें आहे, त्यांत मुंबई प्रांताचे डॉ. शिरनामे हे आहेत.

**सुपीक जमिनींत सरकारी खात्यानें लागवड करावी—**अन्नपरिस्थिति सुधारण्यासाठी धान्याचें उत्पादन वाढविण्याकरितां श्री. सी. राजगोपालाचार्य ह्यांनीं सूचना केली आहे. मद्रास प्रांतांतील कावेरी, गोदावरी आणि कृष्णा हा नद्यांचे भोवताली सुपीक जमीन मुबलक आहे. त्या जमिनींच्या मालकांकडून सरकारनें त्यांची जमीन योग्य खंडानें सक्तीनें घ्यावी व शास्त्रीय पद्धतीनें स्वतःच्या शेतकी खात्यामार्फत त्यांत लागवड करावी, असा वरील सूचनेचा आशय आहे. असें केल्यास उत्पादन दसपट वाढेल आणि प्रांत अन्नाचे बाबतींत स्वयंपूर्ण होईल, अशी श्री. राजगोपालाचार्य ह्यांची कल्पना आहे.

**मेजवानीस अद्याप ५० पाहुणे—**लग्नानिमित्त खावयाच्या मेजवानींस ५० पेक्षा जास्त पाहुणे बोलावतां कामा नये, असा मद्रास सरकारने निर्बंध घातला आहे. दुष्काळाची एवढी तीव्रता असतांना, ५० पाहुण्यांची सोय कशाला ?

**श्री. जोशी व श्री. सुंदरेशन—**इंटरनॅशनल मोनेटरी फंड व इंटरनॅशनल बँक ह्यांच्या एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टरचे जागीं हिंदुस्थानतर्फें अनुक्रमें श्री. जे. व्ही. जोशी व श्री. एन. सुंदरेशन ह्यांची नेमणूक झाली आहे.

**लष्करांतून परतलेले सैनिक—**हिंदी लष्करांतून एप्रिलें, १९४६ मध्यें एकूण ९१,००० सैनिकांची मुक्तता करण्यांत आली. म्हणजे, आतांपर्यंत मुक्त झालेल्यांची संख्या ५,९०,०७१ झाली आहे.


**D. E. SOCIETY'S**

**Brihan Maharashtra College of Commerce, Poona 4**

The College reopens on the 20th June, 1946. Admissions to the F. Y., I. Com. and B. Com. classes will begin from 10th June. Applications for admission to the College and hostel should be made to the Principal in the prescribed form. The College Prospectus containing the application form will be sent on receipt of postage stamps worth two annas.

**D. G. KARVE,**
*Principal.*

# कपाशीचें उत्पादन व कापडाचा धंदा

हिंदुस्थानांतील कपाशीची लागवड सरकारनें मुद्दाम नियंत्रित केली आहे. अधिक धान्य पिकविण्यासाठीं ज्यास्त जमीन उपलब्ध व्हावी, ह्या हेतूनें कपाशीखालील क्षेत्र कमी करण्यांत आलें आहे. १९४१–४२ मध्यें २ कोटि ४१½ लक्ष एकरांत कपास पेरण्यांत आली होती; १९४५–४६ चा तत्सम आकडा ४०% नें कमी म्हणजे १ कोटि ४५ लक्ष एकर एवढाच आहे. मुंबई प्रांतानें तर ह्या मुदतींत कायदेशीर उपाय योजून आपल्या हद्दीमधील कपाशीखालील क्षेत्र ७४% नें कमी केलें आहे. धान्यनिर्मितीची तातडीची आवश्यकता निर्विवाद आहे; तथापि कपाशीचें क्षेत्र सक्तीनें मर्यादित केलें आहे, त्याचे परिणाम काय होत आहेत इकडेहि दुर्लक्ष करून भागणार नाहीं.

पूर्वी मोठ्या प्रमाणावर कपास निर्गत करणाऱ्या हिंदुस्थानास आतां कपाशीच्या आयातीवर अधिकाधिक अवलंबून रहावें लागत आहे. इकडे, हिंदी गिरण्यांतील हिंदी कपाशीचा उठाव वाढत आहे. पूर्वी जपान ज्या देशांकडे कापड पाठवीत असे, तेथील बाजारपेठ काबीज करणें हिंदुस्थानास अगदी शक्य आहे. परंतु, तसें करण्यास हिंदुस्थानास संधि मिळाली पाहिजे. आयात होणाऱ्या लांब धाग्याच्या कपाशीपासून बनविण्यांत येणारें कापड महाग असतें; मलाया, जाव्हा, वगैरे ठिकाणीं हिंदी कापड धाडावयाचें असल्यास तें स्वस्त असणें आवश्यक आहे आणि त्यासाठीं हिंदी कपाशीचा पुरवठा वाढावयास हवा, असें सांगण्यांत येत आहे. खुद्द हिंदी कपाशीसच चीन व जपान येथें पुष्कळच वाव आहे. परंतु ही अंतर्गत व निर्गतीची मागणी पुरवण्याइतकें हिंदी कपाशीचें उत्पादन सध्या होणेंच कसें अशक्य आहे, हें सर चुनीलाल भाईचंद मेहता ह्यांनीं दिलेल्या खालील आकड्यांवरून स्पष्ट होईल.

**हिंदी कपाशीचा ताळेबंद**

**१९३९–४० ते १९४५–४६**

| | गाठी |
|---|---|
| ३१ ऑगस्ट १९३९ रोजीं शिल्लक | १८,०६,००० |
| १९३९-४० ते १९४५-४६ मधील उत्पादन | ३,७६,५०,००० |
| हिंदी कपाशीचा एकूण पुरवठा | ३,९४,५६,००० |
| **कपाशीचा उठाव** | |
| १९३९-४० ते १९४५-४६ मधील निर्गत | ७१,९१,००० |
| गिरण्यांतील खप | २,७५,२५,००० |
| घरगुती खप | २०,००,००० |
| हिंदी कपाशीचा एकूण उठाव | ३,६७,१६,००० |
| ३१ ऑगस्ट, १९४६ रोजीं शिल्लक | २७,४०,००० |

ह्या शिल्लकी कपाशीपैकी बहुतेक कपास कनिष्ठ दर्जाची आहे.

**१९४६–४७**

**(अंदाज)**

| | गाठी |
|---|---|
| ३१ ऑगस्ट १९४६ रोजीं शिल्लक | २७,४०,००० |
| अपेक्षित उत्पादन | ४०,००,००० |
| हिंदी कपाशीचा एकूण पुरवठा | ६७,४०,००० |
| निर्गत | १५,००,००० |
| हिंदी गिरण्यांतील खप | ४२,५०,००० |
| घरगुती खप | १,५०,००० |
| एकूण उठाव | ५९,००,००० |
| ३१ ऑगस्ट १९४७ रोजीं शिल्लक | ८,४०,००० |

## चीनला अमेरिकेचें कर्ज

जगांतील सगळ्यांत अधिक संपन्न राष्ट्र या नात्यानें अमेरिकेकडे आज ब्रिटन–रशिआसारख्या मोठ्या राष्ट्रांनाही धांव घ्यावी लागत आहे. मग चीनसारख्या मागासलेल्या राष्ट्रानें कर्जाची याचना करावी यांत कांहींच नवल नाहीं. अमेरिकेकडून चीनला ५० कोटी डॉलर्स कर्ज देण्याबद्दलच्या वाटाघाटी चालू असून, सदर कर्जाच्या विनियोगाचे सर्वाधिकार जनरल जॉर्ज मार्शल यांना देण्यांत आल्याचें समजतें. जनरल मार्शल हे अमेरिकेचे प्रमुख लष्करी अधिकारी होते हें लक्षांत घेतां त्यांना देण्यांत आलेल्या अधिकारांना किती महत्त्व असेल हें लक्षांत येण्यासारखें आहे. अमेरिकेचें परराष्ट्रीय धोरण अध्यक्ष ट्रुमन व परराष्ट्रमंत्री बर्न्स हे डॉलरच्या किमयेनें यशस्वी करण्याच्या प्रयत्नांत आहेत अशी टीका त्यांच्यावर करण्यांत येत आहे. जनरल मार्शल यांना जे अधिकार देण्यांत आले आहेत त्यांचा उपयोग करून ते चीनला लष्करी दृष्ट्या स्वसंरक्षणक्षम बनवितील असें दिसतें. पण चीनच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीनें–लष्करी दृष्टीनें कर्जाचा उपयोग केला जाणें इष्ट नाहीं. हिंदुस्थानप्रमाणें चीनाहि दुष्काळाच्या सावलींत सांपडलेला असल्यामुळें तेथील जनतेच्या योगक्षेमाची तरतूद आधी करणें जरूर आहे. जनरल मार्शल यांची नेमणूक करण्यांत आली त्यावेळीं प्रे. ट्रुमन यांनीं असें जाहीर केलें होतें कीं, चीन आपली आर्थिक परिस्थिति सुधारण्याचे ज्या मानानें प्रयत्न करील त्यां मानानेंच अमेरिका चीनला कर्ज देईल. पण त्यानंतर घडून आलेल्या कांहीं घटनांमुळें प्रे. ट्रुमन यांनीं आपला विचार बदललेला दिसतो.

## कर्जनिवारण कायदा

पुणें जिल्ह्यांतील खेड, जुन्नर, आंबेगांव, इंदापूर, शिरूर व दौंड ह्या तालुक्यांना वरील कायदा लागू केला आहे. ज्या शेतकऱ्यांनीं कर्जनिवारण बोर्डाकडे अर्ज केले असतील किंवा ज्यांचेवर बोर्डाचे हुकुमनामे झाले असतील अशा शेतकऱ्यांना शेतीचे चालू कामासाठीं ( पीक उभारणेसाठीं ) कर्ज देणेची व्यवस्था सरकारने केली आहे. खेड व जुन्नर व आंबेगांव या तालुक्यांच्या मावळ भागांतील अनुक्रमें ५१, ५५ व ३० गांवें खेरीज करून बाकी सर्व तालुक्यांत व इंदापूर, दौंड व शिरूर या तालुक्यांत सहकारी संस्थांमार्फत कर्ज देणेची योजना आखलेली आहे. ज्या गांवांना सहकारी सोसायटी असेल तेथील शेतकऱ्यांनीं त्या गांवच्या सोसायटीकडे कर्जासाठीं अर्ज करावे. ज्या गांवीं सहकारी सोसायटी नसेल अशीं गांवें नजीकच्या सहकारी सोसायटींत सामील करून घेण्यांत आलीं आहेत. तेव्हां नजीकच्या सहकारी सोसायटीकडे कर्जाबद्दल चौकशी करावी. ज्या गांवांना किंवा जवळपास चार पांच मैलांचे आंत सहकारी सोसायटी नाहीं, अशा कांहीं थोड्या गांवांना पुणें सेंट्रल को. बँकेकडून कर्ज मिळूं शकेल. आतां शेतीचा हंगाम जवळ आला आहे व शेतकऱ्यांची गैरसोय होऊं नये म्हणून आतांपासून तजविजीस लागलें पाहिजे, नाहींतर पुढें आयत्यावेळीं फजितीचा प्रसंग येईल. तो येऊं नये म्हणून आतांपासून सावधगिरी बाळगिली पाहिजे. अधिक माहिती लागल्यास श्री. यु. एन्. केसकर, डिस्ट्रिक्ट को–ऑपरेटिव्ह ऑफिसर, पुणें जिल्हा, पुणें, यांचेकडून मिळेल.

# स्फुट विचार

## हिंदुस्थानसाठी अर्जेंटायनांतील गहू ?

हिंदुस्थान सरकारचे वॉशिंग्टन येथील एजंट सर गिरजाशंकर वाजपेय यांनीं अर्जेंटायनामधील गहू हिंदुस्थानांत पाठविण्याची खटपट चालविली आहे असें समजतें. अर्जेंटायना देशांत गव्हाचें पीक भरपूर आलेलें असून त्याचा उपयोग जनावरांना खाऊं घालण्याकडे होत असल्याच्या वार्ता यापूर्वी अनेकवार येऊन गेलेल्या आहेत. ही खटपट आतां होत असेल तर उत्तमच; पण यापूर्वीच यासंबंधी वाटाघाटी होऊन धान्य हिंदुस्थानांत पोचविण्याची व्यवस्था होणें जरूर होतें. पण तसे प्रयत्न होण्याच्या मार्गांत संयुक्त-राष्ट्रांची अन्नधान्य समिति आली असें दिसतें. कारण गेल्या आठवड्यांत कॉमन्स सभेंत झालेल्या अन्नावरील चर्चेत मजूरपक्षीय मंत्री यांनीं असें सांगितलें कीं कोणत्या देशानें कुठें किती धान्य पाठवावयाचें तें संयुक्त अन्नधान्य समितीमार्फतच ठरणार आहे व ठरलें पाहिजे. वास्तविक दुष्काळग्रस्त जगाची परिस्थिति आटोक्याच्या बाहेर जाण्याची शक्यता सर्वमुखीं मान्य असतांना संस्थांच्या इभ्रतीचा प्रश्न बाजूला ठेवून धान्याची रवानगी पूर्वेकडील देशांकडे व्हावयास पाहिजे होती. संयुक्त अन्नधान्य समितीकडून हिंदुस्थानसाठी ज्या धान्याची मंजुरी मिळाली आहे त्याहून अधिक ५ लाख टन गहू जर अर्जेंटायनाकडून हिंदुस्थानला मिळाला तर अन्नधान्याची टंचाई बऱ्याच प्रमाणांत कमी होईल. मात्र हा गहू सप्टेंबर संपण्याच्या आंत हिंदुस्थानांत आला पाहिजे. अन्नधान्याच्या जागतिक आघाडीवरची विशेष बातमी म्हणजे २० राष्ट्रांनीं मिळून एक नवीन आंतरराष्ट्रीय अन्नसमिति स्थापन करण्याचें ठरविलें आहे. या संघटनेला अजून संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अन्न व शेती समितीची मान्यता मिळावयाची आहे. दरम्यान अमेरिकेंतील पावाचें वजन कमी करण्यांत आलें असून इंग्लंडमध्येंही पावाचें वाटप नियंत्रित करण्यांत येणार आहे असें म्हणतात.

## आंतरराष्ट्रीय परिस्थिति

पॅरिस येथील बड्या परराष्ट्रमंत्र्यांची परिषद् अयशस्वी होऊन अमेरिका, ब्रिटन व रशिया यांचे परराष्ट्रीय मंत्री आपआपल्या ठिकाणीं परत गेले. परिषदेच्या अपयशाची मीमांसा करण्याच्या निमित्ताने अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मि. बर्न्स यांनी रशियावर दोन प्रमुख आरोप केले. पहिला असा कीं चर्चा होऊं देण्याच्या अधिकाराचा रशिया दुरुपयोग करूं लागला आहे त्यामुळें कोणत्याहि एका प्रश्नावर बड्या राष्ट्रांपैकी एकाचें मत बाकीच्या बड्या राष्ट्रांच्या विरुद्ध असलें कीं त्याची सोडवणूक होणें अशक्य होतें. म्हणून येत्या १५ जुलैपर्यंत शांतता परिषद् भरविण्यांत परराष्ट्रमंत्री, परिषदेला यश न आलें तर हा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघटनेकडे सोपविण्याची सूचना अमेरिका करणार असल्याचें मि. बर्न्स यांनी जाहीर केलें. या आरोपास एम्. मोलोटाव्ह यांनी उत्तर देऊन असें सांगितलें कीं शांतता परिषद् भरविण्याचा संयुक्त राष्ट्रसंघटनेशी कांहीं संबंध नाहीं. उलट अमेरिका ब्रिटनच्या रशियाशीं घडून आलेल्या युद्धकालीन सहकार्यांत मोडता घालीत असून रशिआविरोधी गट बनवीत आहे. मि. बर्न्स यांनी रशिआने व्यापलेल्या युरोपांतील देशांकडे अंगुलीनिर्देश करून असें म्हटलें कीं देशविस्तार आणि सुरक्षिततेसाठीं दक्षता यामधील फरक न कळण्यासारखी परिस्थिति रशिआनें निर्माण केलेली आहे. मि. बर्न्स यांच्या आरोपाला एम्. मोलोटाव्ह यांनीं उत्तर देतांना अमेरिकेच्या पॅसिफिक व अटलांटिक समुद्रांतील नाविक व आरमारी तळांचा उल्लेख केला; आणि अमेरिकेवर साम्राज्यशाहीचा आरोप केला. या आरोप-प्रत्यारोपाच्या खटल्यांतून मार्ग काढणें जरूर असलें तरी निदान रशिया चालढकलीचें धोरण स्वीकारीत आहे असें दिसतें. युरोपमधील आजची सामाजिक स्थिति समाजवादाला पोषक असल्यानें काळ आपल्या बाजूचा आहे अशी रशिआचे नेत्यांना खात्री दिसते. झेकोस्लोव्हाकिआंतील कम्युनिस्ट पक्षाने डॉ. बेनेस यांच्या उत्क्रांतिवादी धोरणाच्या पक्षापेक्षाहि अधिक मतें मिळविलीं आहेत. त्यावरून रशिअन धोरणाची यशस्विता दिसून येते.

## विमानांच्या उत्पादनासाठी कारखाना

युनायटेड किंग्डम एअर क्राफ्ट मिशनने मार्च, १९४६ मध्यें हिंदुस्थानास भेट देऊन, येथें लष्करी व नागरी उपयोगासाठी विमानांचें उत्पादन करणाऱ्या कारखान्याच्या स्थापनेसंबंधीं माहिती जमवून विचारविनिमय केला. ह्या मिशनने बंगलोर येथील सध्याच्या कारखान्यांत विमानांचें उत्पादन सुरू करण्यांत यावें असें सुचविलें आहे आणि २० वर्षांत विमानांचे बाबतींत हिंदुस्थान स्वयंपूर्ण व्हावा अशी योजना आखली आहे. कारखान्याच्या डायरेक्टर बोर्डावरील मॅनेजिंग डायरेक्टर, टेक्निकल डायरेक्टर आणि वर्क्स डायरेक्टर हे इंग्रज असावयाचे आहेत; कारण त्या जागीं काम करण्यास लायक असे हिंदी तज्ज्ञ अद्याप तयार झालेले नाहींत. परंतु, हिंदी तज्ज्ञ तयार करणें हें कारखान्याच्या योजनेचें एक महत्त्वाचें उद्दिष्ट राहील. हिशेब पहाणारा डायरेक्टर हिंदुस्थानांतीलच नेमण्यांत येईल. हे चार डायरेक्टर आपला पूर्ण वेळ कारखान्याकडे खर्च करतील. ह्याखेरीज इतर डायरेक्टरहि असतीलच. कंपनीस सर्व भांडवल हिंदुस्थान सरकार पुरविणार आहे. कारखान्यांतून तयार झालेलें पहिलें विमान आकाशांत उडूं लागण्यास आणखी दीड वर्षांचा अवधि आहे.

## हॅंडमेड पेपर लि., ओगलेवाडी

वरील कंपनी ड्रॉइंग पेपर, क्रॅफ्ट पेपर, वॉटरप्रूफ पेपर, पॅकिंग पेपर, कार्ड बोर्ड, स्ट्रॉबोर्ड, इत्यादि कागद किंवा रांधा ह्यांच्या वस्तू तयार करण्याच्या उद्देशानें ओगलेवाडी येथें स्थापन करण्यांत आली आहे. चिंध्यांपासून उत्कृष्ट हातकागदाचें उत्पादन कंपनी प्रथम हातीं घेईल. श्री. पदमजी शेठ हे कंपनीस अध्यक्ष म्हणून लाभले आहेत. त्यांचा कागदाचे धंद्यांतील अनुभव सुप्रसिद्ध आहे. श्री. दोराब डी. डी. पदमजी, देवास ज्यू.चे अर्थमंत्री श्री. देशपांडे, डॉ. सौ. नलिनीबाई पंत, श्री. एम. जी. करमरकर वगैरे डायरेक्टर असून मॅनेजिंग एजन्सी एस. पी. ओगले आणि कं. कडे आहे. तिचेतर्फे श्री. एस. जी. पाध्ये व श्री. व्यंकटराव ओगले हे बोर्डावर आहेत. कंपनीने तूर्त ३ लक्ष रुपयांचे ३०,००० ऑर्डिनरी भाग विक्रीस काढले आहेत ते सर्व मुंबई येथील शेअर व स्टॉक ब्रोकर श्री. भांबुरकर ह्यांनी अंडररोइट केले आहेत.

**१५१/२ कोटि रु. कर्जाच्या तडजोडीची मागणीः**—मुंबई सरकारनें प्रांताच्या वेगवेगळ्या भागांत कर्जतडजोड बोर्डें स्थापन केलीं आहेत. त्यांच्याकडे एकूण ३३३२७४ अर्ज आहेत. त्यांतील कर्जाची रक्कम सुमारें १५१/२ कोटि रुपये आहे.

### लँकेशायरच्या गिरण्यांपुढील प्रश्न

ऑक्टोबर, १९४५ मध्यें प्रेसिडेंट ऑफ दि बोर्ड ऑफ ट्रेड सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स, ह्यांनीं ब्रिटिश गिरण्यांच्या परिस्थितीची पहाणी करण्यासाठीं कॉटन वर्किंग पार्टी नेमली, तिचे सर जॉर्ज शूस्टर हे अध्यक्ष होते. मालकांचे चार व मजूर संघांचे चार प्रतिनिधी आणि चार स्वतंत्र असे बारा सभासद त्या कमिटींत होते. सध्याच्या गिरण्या युद्धपूर्व पद्धतीनें चालविण्यास पुरेसे कामगार उपलब्ध नाहींत; जरूरीच्या मानानें फार तर दोन तृतीयांश एवढी त्यांची संख्या आहे, असें कमिटीस आढळून आलें. तेव्हां लँकेशारच्या गिरण्यांनीं आपली यंत्रसामुग्री सुधारून दर कामगारामागें ज्यास्त उत्पादन कसें पडेल इकडे लक्ष दिलें पाहिजे, अशी कमिटीची सूचना आहे. उत्पादक आणि व्यापारी ह्यांचेमधील दुवा म्हणून एक सहकारी मार्केटिंग कंपनी स्थापण्यांत यावी, अशी कमिटीची शिफारस आहे. लँकेशायरच्या गिरणीवाल्यांनीं रिपोर्टांतील वरील व इतर सूचना ह्यांकडे दुर्लक्ष केलें, तरं ह्या धंद्याचें राष्ट्रीयकरण केल्याविना गत्यंतर उरणार नाहीं असें कमिटीमधील मजूर संघांच्या चारहि प्रतिनिधींनीं स्पष्ट केलें आहे.

---

### दशमान पद्धतीचीं नाणीं सुरू होणार

हिंदी नाणीं दशक पद्धतीची करण्यासंबंधीं एक योजना हिंदुस्थान सरकारच्या फडणिशी खात्यानें गेल्या वर्षीं आखली व तिचेवर लोकमत व्यक्त व्हावें ह्यासाठी तिच्या प्रती प्रांतिक सरकारें, व्यापारी चेंबर्स, शेड्यूल्ड बँका, इत्यादींच्याकडे पाठण्यांत आल्या. नवीन पद्धतीचे नाण्यांचें कोष्टक व नाणीं सुरू करण्यांत अनेक अडचणी असल्या तरी त्यांपासून होणारे फायदे महत्त्वाचे आहेत, ह्या दृष्टीनेच सरकारने सुधारणा सुचविली आणि व्यक्त झालेलें लोकमतहि सुधारणेस सामान्यतः पोषक आहे. ही सुधारणा घडवून आणण्यासाठी हिंदुस्थान सरकारने आपला कॉयनेज ॲक्ट दुरुस्त करण्याचें ठरविलें आहे. नवीन तयार केलेलें कलम १४ वें कलम म्हणून सध्याच्या कायद्यास जोडलें जाईल.

सध्याचा रुपया, अधेली व पावली हीं आतां अनुक्रमें १०० सेंट, ५० सेंट व २५ सेंट ह्यांच्या बरोबरीचीं होतील. ह्याखालील दुय्यम नाण्यांची किंमतहि १६ आण्याचे किंवा १९२ पयांचे १०० सेंट, ह्या दरानें ठरविली जाईल. अर्धा सेंट हें सर्वांत लहान नाणें काढण्यांत येईल. प्रस्तुत बिलावर कोणासहि आपलें मत सरकाराकडे पाठवावयाचें असल्यास, तें ३१ ऑगस्टपूर्वी पाठविलें पाहिजे.

---

### औंध म्यूच्युअल लाइफ ॲ. सोसायटी लि., पुणें

वरील विमा कंपनीनें १९४५ सालीं ७,०७,७७३ रुपयांचें काम पुरें केलें, त्याचे वार्षिक हप्ते ४६,६०० रुपयांचे आहेत. रिन्युअल खर्चाचें प्रमाण फक्त १४% आहे, ही गोष्ट नमूद करणें आवश्यक आहे. विमा खातीं फंड आतां ९९,९१६ रुपये झाला आहे. ३१ डिसेंबर १९४५ अखेरचें कंपनीचें मूल्यमापन चालू असून तें ॲक्चुअरी प्रो. दिवाण ह्यांचेकडे सोपविलेलें आहे. कंपनीचे पहिल्यापासूनचे चेअरमन श्री. व्ही. पी. वर्दे ह्यांनीं कार्यबाहुल्यामुळें आपल्या जागेचा अहवालाचे वर्षीं राजीनामा दिला आहे. मॅनेजिंग डायरेक्टर श्री. व्ही. जी. जोशी ह्यांनीं अलॉवन्स किंवा वहानाचा खर्च म्हणून एक पैहि कंपनीकडून घेतलेली नाहीं, ही गोष्ट हिशेबाचा तक्ता काळजीपूर्वक पाहिल्याखेरीज लक्षांत येत नाहीं, कारण डायरेक्टरांच्या रिपोर्टांत त्याचा उल्लेख नाहीं. कंपनीच्या उत्कृष्ट परिस्थितीबद्दल व स्वतःच्या स्वार्थत्यागाबद्दल मॅनेजिंग डायरेक्टर अभिनंदनास पात्र आहेत.


**सन १९४५ मधील प्रगति**

नवें काम ७,००,००० रु.
चालू काम १०,००,००० रु.
१९४५ मधील हप्त्यांचें उत्पन्न सुमारें १,००,००० रु.
खर्चाचें प्रमाण फक्त ११%
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

**दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.**

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर









आमच्या वाचकांसाठी

# सोपें केलेलें अर्थशास्त्र

( ३ )

ले.:—श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम., पुणें ५.

( ह्या विषयावरचा दुसरा लेख ता. १७ एप्रिलच्या अंकांत आला आहे. )

## उपभोग अर्थात् गरजांच्या समाधानाची मीमांसा

**गरजांचें स्वरूपः**—गरजा अनेकविध असतात. देशकाल-वर्तमानाप्रमाणें त्यांच्या स्वरूपांत फरक पडत राहतो. त्या वाढवाव्या तेवढ्या वाढूं शकतात अथवा विशिष्ट मर्यादेपर्यंत कमी करतां येतात. नैसर्गिक गरजा न भागवतां आल्या तर जीवन कष्टमय होतें. त्या योग्यप्रकारें भागवतां आल्या तर सुखप्राप्ति होऊन जीवनाचा विकास होण्यास मदत होते. त्यांच्यापुढें गरजा वाढविणें याचा अर्थ चैन करणें. सुखलोलुपतेच्या आहारीं गेल्यास विकास न होतां आलस्य, पराधीनता आणि दारिद्र्य यांना आमंत्रण मिळतें, किंवा दुसऱ्याचें अपहरण करण्याची बुद्धि होते. तिच्या पोटींच जगांतल्या युद्धांचा उगम होतो. पाश्चात्यांनीं अशाप्रकारची वृत्ति ठेवल्यामुळें जगांतल्या अलीकडच्या भयंकर लढाया झाल्या यांत संशय नाहीं.

निसर्गधर्म व माणसाची वृत्ति यांच्या खेळामुळें गरजा चिरकाल राहणार. तेव्हां त्यांच्या समाधानाकरतां कायमचें धडपड करीत राहणें मनुष्यजातीला भाग आहे. पण या चिरत्वाला एक भेद आहे. विशिष्ट गरज विशिष्ट समयीं अथवा स्थळीं पूर्णपणें शमूं शकते. माणसाला भूक लागते त्यावेळेस एकदां पोटभर जेवल्यावर पुन्हां लगेच मिठाई दिली तरी ती खाण्याची इच्छा रहात नाहीं. एका वेळेस किती खातां येईल याला पोटाच्या आकारानें मर्यादा घालून ठेवलेली आहे. एकादा लंबोदर दहा पंधरा बुंदीचे लाडू खाऊं शकेल, पण त्यानंतर खादाडपणा केल्यास श्वास लागून ओवा मागण्याची पाळी निश्चित येईल. एका वेळेस किती वस्त्रें परिधान करतां येतील हें मोजणें कठीण नाहीं. चहाभक्त लागोपाठ पांच सात कपांपेक्षां जास्त पिण्याच्या भरीस पडत नाहीं, कारण चार दोन कप घेतल्यावर चहाची तलफ कमी होऊं लागते. याप्रमाणें कोठल्याही गरजेला, तसेंच तलफेलाही मर्यादा आहे. इतकेंच नव्हे तर एका वेळेस हावरटपणा केल्यास तो अंगाशीं आल्याशिवाय रहात नाहीं. जसजसें खाणें, पिणें, पेहरणें व वेळेस मिळत जाईल तसतशी इच्छा कमी कमी होत जाईल व शेवटीं वेळ अशी येईल कीं त्यापुढें भुक्त वस्तूपासून कवडीचेंही सुख न मिळतां त्यापासून निश्चितपणें पराङ्मुखता उत्पन्न होईल. कोणी म्हणेल कीं एकादा ताडी प्यायला लागला कीं त्याची इच्छा वाढतच जाते. बरोबर असेल, पण भरपूर पिऊन गटारांत पडल्यावर मदिराभक्ताला आणखी पिण्यास शुद्धच उरत नाहीं हें गुत्त्यावर गेल्यास सहज दिसेल. यावरून अनुमान निघतें कीं, गरजा जरी पुन्हां पुन्हां उद्भवणाऱ्या असल्या तरी त्या शम्य आहेत.

कांहीं गरजा एकमेकांना पूरक असतात. त्या पुऱ्या होण्याकरतां एकापेक्षा अधिक जोड वस्तूंची जरूरी असते. जुनें पेठेंतलें घर सोडून गांवाबाहेर बंगल्यांत रहावयाचें म्हटलें तर बंगल्यास शोभेसें सामान घ्यावयास हवें. गांवापासून दूर राहणें सुरू झाल्यानें वाहनाची आवश्यकता उत्पन्न होते. गाडी घेतली तर त्याबरोबर घोडा व त्याला पाहण्याकरता गडी हेही लागतात. ज्या प्रमाणांत राहणी वाढेल त्या प्रमाणांत गरजा व त्यांची पूरकता वाढत जाते. य नंतर अनेक गरजांपैकी प्रथम कोणती पुरी करावयाची याचा माणसाला नेहमी विचार पडत असतो. क्षुल्लक क्षणिक गरजेपासून टिकणाऱ्या महत्वाच्या गरजेपैकी कोणतीस प्राधान्य द्यावयाचें, चहा कीं कॉफी, चप्पल का जोडा, धोतर कीं विजार, सिनेमा कीं नाटक, टांगा कीं टॅक्सी, यांपासून ते थेट यंदा घराला प्रथम रंग द्यावयाचा कीं शाकारणी करावयाची, मोटार घ्यायची का शेतवाडी घ्यावयाची अशा जास्त महत्त्वाच्या गोष्टींपैकी अमलांत पहिल्यांदा कोणत्या आणावयाच्या याबद्दल पदोपदीं निर्णय घ्यावा लागतो, यांतूनच गरजांची व त्यामुळें गृह्य वस्तूंची प्रतवारी उभी राहते.

**जिनसाः**—गरज ज्या साधनाने भागविली जाते तो जिन्नस. त्याला वस्तू म्हणा, पदार्थ म्हणा अथवा समुदायवाचक माल म्हणा. ज्या वस्तूंशीं हरघडीं संबंध येतो त्या वस्तू जड अथवा डोळ्याला दिसणाऱ्या असतात. पण कांहीं गरजा पुऱ्या करताना जड वस्तूशीं अथवा जिनसांशीं संबंध येतोच असें नाहीं. गाडी दाराशीं आल्यावर फाटक उघडलें जाण्याची जी गरज ती नोकराच्या सेवेमुळें भागविली जाते. नोकरानें केलेली सेवा ही डोळ्याला दिसत नाहीं. पण गरज भागविली जाण्याच्या दृष्टीनें जड पदार्थ अथवा ही सेवा यांचें स्वरूप एकच आहे. फरक येवढाच कीं, सेवेला पदार्थ अथवा जिन्नस म्हणण्यांत भाषाभंग होतो. गरज भागविली जाण्याचें वस्तूचें जें कार्य ती उपयुक्तता. उपयुक्तता आहे म्हणून माणूस कोठलीही वस्तू मिळवण्याचा प्रयत्न करतो. त्या वस्तूपासून त्याला समाधान प्राप्त होणार असतें. उलटपक्षीं ज्या पदार्थापासून कोठलेंही समाधान होण्यासारखें नाहीं तो पदार्थ मिळवण्याच्या भरीस कोणीही पडणार नाहीं. कोणत्याही वस्तूचा हव्यास करतांना त्यापासून अपेक्षिलेल्या समाधानाच्या दृष्टीनें माणूस तिची उपयुक्तता अथवा अनुपयुक्तता सारखी तोलून पहात असतो.

जगांत कोठलीही वस्तू मोफत अशी क्वचितच मिळते. हवा पाणी उजेड हीं विनासायास जोंपर्यंत मिळताहेत तोंपर्यंत त्या 'वस्तू' मोफत होत. पण जेव्हां पाणीपुरवठ्याकरितां भिस्ती नेमावा लागतो अथवा मोठालीं तळीं, धरणें, कालवे वगैरे बांधावे लागतात तेव्हां त्याच वस्तूला आर्थिकता प्राप्त होते. मुंबईंतील कोंडलेली हवा मोफत आहे. पण पैसे खर्च करून जेव्हां मुंबईकर शेटजी माथेरानला भरमसाट भाडें देऊन बंगल्यांत रहावयास जातात तेव्हां हवेचा मोफतपणा नाहींसा होऊन तिला महत्त्व येतें. तेथें खर्चलेला पैसा वास्तविक तेथल्या हवेची किंमत होय हें लक्षांत घेतलें पाहिजे. जेव्हां इच्छित पदार्थ मिळविण्याकरितां श्रम करावे लागतात, अनेकविध वस्तूंची जमवाजमव करावी लागते. हें कीं तें याचा निश्चय करून निर्णय करावा लागतो व पैसा खर्च करावा लागतो. तेव्हां आर्थिकता निर्माण होते, सुरवातीच्या प्रकरणांत दर्शविल्याप्रमाणें कमतरता, दुष्प्राप्यता अथवा दुर्मिळता हीं वस्तूंचीं लक्षणें होत.

ज्या जिनसा तयार स्वरूपांत असून खार्चल्या जाण्याची वाट पहात असतात अथवा ज्या तत्क्षणीं उपयोगांत आणल्या जाणें शक्य व युक्त असतें, त्या भोगक्षम होत. त्यांना भुञ्ज वस्तू म्हणतां येईल. भुञ्ज वस्तू निर्माण करण्याकरितां जे पदार्थ, मालमसाला, कच्चा माल, यंत्रसामग्री वगैरे वापरावे लागतात, त्यांच्या समुच्चयाला उत्पादनोपयोगी वस्तु म्हणतां येईल. भुञ्जवस्तुपासून समाधान तत्काळ मिळतें व त्या वापरण्यास सर्व मनुष्यमात्र उद्युक्त असतो. उत्पादनोपयोगी मालाची तशी स्थिति नाहीं. जेव्हां त्या मालावर निरनिराळे संस्कार घडतील, त्याच्यावर श्रम खर्ची पडतील तेव्हांच भुञ्जवस्तू हातांत येतील. त्यांची निर्मिति हा दूरत्वाचा आणि कालावधीचा प्रश्न होय.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज-वजा
इंडि. यु. ऑ. ०-१५-० दि. १०-६-४५
इंडि. यु. डि. ०-३-० दि. १०-६-४५
सिंप्लेक्स रु. १ दि. ४-७-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार २७।५।४६ | मंगळवार २८।५।४६ | बुधवार २९।५।४६ | गुरुवार ३०।५।४६ | शुक्रवार ३१।५।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; ११९० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | ३१२७-८ | ३१४५-० | ३१३२-८ | ३१३३-१२ | ३१३२-८ |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५५९—० | ५६६—० | ५६१—८ | ५६६—८ | ५६७—० |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २६३२-८ | २६४२-८ | २६१७-८ | २६२३-१२ | २६३०-० |
| ७०२; ५६६ | १९---०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | २६७—० | १७२—० | १६०—० | १६५—० | १८२—० |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ८३८—० | ८३९-० | ८३१—० | ८३२—० | ८३६—० |
| ४४३-८; ३६० | ५-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ५०२—० | ५०८-० | ५०१—८ | ४९८—० | ५००—० |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ४५८—० | ४६०-० | ४५१—० | ४५०—० | ४७०—० |
| ३३५; २८३-८ | ८-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ४०९—० | ४१६-० | ४१०—० | ४१०—० | ४१३—० |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४६५—० | ४६५-० | ४५२—० | ४५१—० | ४५२—० |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५—११ | ५-११-६ | ५-१०-६ | ५—१० | ५-११-० |
| १७१०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २४-३-६ | २४—५ | २४—२ | २४—२ | २४—२ |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | „ डिफर्ड्स | १ | ४-१४-६ | ४-१५-६ | ४—१२ | ४—१३ | ४-१३-६ |
| ७९०; ६४५ | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ९८७—८ | १०२०-० | १०१६-४ | १०२३-१२ | १०११-४ |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | ११० | २६४—० | २६६-१२ | २६६—४ | २६५-१२ | २६५—० |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३२६—० | ३२५-० | ३२३—८ | ३१९—० | ३१७—० |
| ५९२-८; ५१० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६८०—० | ६८७-८ | ६८७—८ | ६८२—८ | ६८२—८ |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ५३—२ | ५४-० | ५३—६ | ५२—१४ | ५२—६ |
|  |  |  | ३½% रोखे | १०० |  |  |  |  |  |

**१० लक्ष रेल्वे कामगारांची संपाची नोटीस**—सुमारें १० लक्ष रेल्वे कामगारांनीं हिंदुस्थानांतील आठ प्रमुख रेल्वेजना " आपण २७ जूनच्या मध्यरात्रीं संपावर जाणार आहों " असें ता. १ जून रोजीं कळविलें आहे. रेल्वेमेन्स फेडरेशननें केलेली मागणी पुरी पाडण्यास दरसाल ३३ कोटि रुपये ज्यास्त खर्च येईल, आणि रेल्वे नोकरांप्रमाणें इतर मध्यवर्ती व प्रांतिक सरकारी नोकरांचाहि पगार वाढवावा लागेल. त्यामुळें सरकारांवर भलताच आर्थिक ताण पडेल, असें हिं. सरकारचे वॉर ट्रॅन्स्पोर्ट सभासद सर एडवर्ड बेंथॉल, ह्यांनीं नुकतेंच सांगितलें.

**संप जवळ आला म्हणजे प्रवास टाळा**—संपाचा दिवस जसजसा जवळ येऊं लागेल, तसतसा लोकांनीं आपला प्रवास शक्य तेवढा टाळावा, म्हणजे अडकून पडण्याचें कारण रहाणार नाहीं, अशी सूचना नॉर्थ वेस्टर्न रेल्वेचे मॅनेजर, मि. हॉल ह्यांनीं जनतेस केली आहे.

**रिक्शावाले**—कलकत्ता शहरांतील ७१·८%, मद्रास शहरांतील ६३·९% व सिमल्यांतील ५६·५% रिक्शावाले २१ ते ३५ वर्षें वयाचे आहेत. सिमल्यांतील ७९·३%, कलकत्त्यांतील ४५% व मद्रासमधील ६१·४% रिक्शावाले कर्जांत आहेत. दरमाणशीं कर्जाचें सरासरी प्रमाण अनुक्रमें ४८९, रुपये १२०रुपये व ११२ रुपये आहे. रिक्शा ओढण्याचा ताण फुफ्फुसांवर व पायाच्या स्नायूंवर भयंकर पडतो. रिक्शांची मालकी " चौधरी " ह्यांकडे असते व ते रिक्शावाल्यांस पिळून काढतात. " रिक्शावाले फुटपाथवर निजतात, सार्वजनिक पाण्याच्या तोटीवर आंघोळ करतात, रस्त्यांवरील हातगाड्यांवर मिळणाऱ्या अन्नावर जगतात. " रिक्शावाल्यांचे हाल लक्षांत घेऊन, रिक्शांची पद्धति बंद करण्यांत यावी, असें सुचविण्यांत येत आहे.

**आगबोटींची मालकी—अमेरिकेचें पुढारीपण**

मालवाहू आगबोटींचे तुलनात्मक आकडे पाहिले, तर युद्धापूर्वीच्या मानाने आतां अमेरिकेच्या आगबोटी पुष्कळच वाढल्या आहेत. जगांत एकूण ६ कोटि, ६ लक्ष टनांच्या आगबोटी १९३९ मध्यें होत्या, त्या आतां ६ कोटि, ९३ लक्ष टनांच्या झाल्या आहेत. म्हणजे, त्यांत १४% वाढ झाली आहे. परंतु, त्यांतील अमेरिकेचा हिस्सा फार मोठा आहे. खालील आकडे पहा:—

| देश | ३० जून १९३९ | ३० जून १९४५ |
|---|---|---|
| अमेरिका ( बिनलष्करी ) | ८६,७२,०९० | ३,७९,५९,००० |
| अमेरिका ( लष्करी ) | ........ | ८२,५४,००० |
| ब्रिटिश साम्राज्य | १,८१,७९,०२० | १,४९,३४,००० |
| बेरीज ( जागतिक ) | ६,०६,०६,५२२ | ६,९३,३५,००० |

फाऊंटन पेनकरितां
लोटस
शाई
सर्वत्र मिळते.

# विनचूकच्या माहितीनें

स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.

किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.

१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—

मायखळा पुल, मुंबई नं. २७.

पूना स्टॉकिस्ट: सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.

—इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत—

## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २७७३८




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

महाराष्ट्र शारदेची तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून

## पैसा व ज्ञान मिळवा !

**श्रीमंत कसें व्हावें**—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधीश व्हा ! किं. १॥ रु.

**१०० टक्के यश**—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील ! किं. १॥ रु.

**काम आणि कामिनी**—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें। अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.

**मृत्युलोकचा प्रवास**—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल ! किं. १ रु.—चारी पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ !

मेसर्स—विपट आणि मंडळी,

पो० कराड, जि. सातारा.

★ वृद्धापकाळची तरतूद

★ कुटुंबाचें संरक्षण

★ मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न

हे सर्व प्रश्न आयुष्याचा विमा उतरल्यानेंच सुटूं शकतात. तरी आपला विमा

पुणें येथील सुप्रसिद्ध

# कॉमनवेल्थ

## ॲशुअरन्स कंपनी लि.

मध्येंच उतरा.

—सर्वत्र एजंट्स नेमणें आहेत.—

खालील पत्त्यावर लिहा अगर भेटा

अध्यक्षः—ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर

श्री. म. जोशी,

अ मॅनेजिंग डायरेक्टर








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.